




दैनिक


# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०६४ ● पुणे ● शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

G-20 शिखर परिषदेसाठी दिखावा 3



पोलिस हे आपले शत्रु नव्हे मित्र - डॉ. राजकुमार शिंदे 4

## भाजप प्रवेशाचे वृत्त निराधार व खोडसाळपणाचे

**संजय जगताप यांचा खुलासा; कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'संजय जगताप यांच्याकडून भाजप प्रवेशाची चाचपणी' अशा स्वरूपाचे वृत्त गुरुवारी काही माध्यमांतून प्रसिद्ध झाले आहे. हे वृत्त निराधार, बिनबुडाचे, खोडसाळपणाचे आणि जाणूनबुजून माझी बदनामी करणारे आहे. आपण काँग्रेस पक्षाशी निष्ठावान असून, भाजपमध्ये जाण्याचा काहीच संबंध येत नाही, असा खुलासा पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व माजी आमदार संजय जगताप यांनी केला. अशा स्वरूपाचे बदनामीकारक वृत्त देणाऱ्या माध्यमांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

माजी आमदार संजय जगताप म्हणाले, "गुरुवारी काही माध्यमांकडून संजय जगताप भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करण्याबाबत चाचपणी करत असल्याचे वृत्त प्रसिद्ध केले गेले. अशा चुकीच्या बातमीमुळे माझ्या कार्यकर्त्यांमध्ये, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, समाजमध्येही गैरसमज पसरला आहे. यामुळे माझी प्रतिमा मलिन झाली आहे. ही बातमी प्रसिद्ध करताना माझा कोणताही खुलासा घेतला गेला नाही. यापूर्वी काही माध्यमांकडून जाणीवपूर्वक माझी बदनामी होईल, अशा स्वरूपाचे वृत्त प्रसिद्ध केले गेले आहे. त्यात्या वेळी संबंधित माध्यमांना ताकीद देऊनही असे प्रकार वारंवार घडताहेत, ही खेदाची बाब आहे."

"माध्यमांनी वृत्त प्रसिद्ध करताना संबंधित व्यक्तीकडून त्याचा खुलासा घेणे अपेक्षित आहे. मात्र, सनसनाटी निर्माण करण्यासाठी असे खोटे व खोडसाळपणाचे वृत्त प्रसिद्ध केले जाते, ही बाब गंभीर आहे. भाजपमध्ये प्रवेश करण्याचा विचारही आपल्या मनाला शिवत नाही. त्यामुळे अशा बातम्यांनी व्यथित झालो आहे. कार्यकर्ते, पदाधिकारी व समाजातील संभ्रमाचे वातावरण सुरू व्हावे, यासाठी माझी बाजू स्पष्ट करीत आहे. माध्यमांनी जबाबदारीने वार्तांकन करायला हवे," असे संजय जगताप यांनी नमूद केले.

# संतोष देखमुख हत्या प्रकरणात 'ताईगिरी'

**प्रकरणात तृप्ती देसाईंची एन्ट्री : दिंडोरीचा आश्रम अन् वाल्मिक कराडचा संबंध असल्याचा केला दावा**



### लैंगिक शोषणाचे आरोप

**ज्या महिलांनी आमच्याकडं तक्रारी दिल्या आहेत त्यांनी दिंडोरीचे प्रमुख आण्णासाहेब मोरे ज्यांना गुरुमाऊली म्हटलं जातं त्यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केले आहेत. यात आणखी काही पुरावे हातात आल्यानंतर याबाबत मी पत्रकार परिषद घेणार आहे. माझ्याकडं असे काही पुरावे आलेले आहेत, याबाबतचा पेनड्राईव्ह मी उघडला तर अनेक महिलांचं लैंगिक शोषण केल्याचं उघड होणार आहे. त्याचे पुरावे माझ्याकडं आहेत, असा दावाही यावेळी तृप्ती देसाई यांनी केला आहे.**

### मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा

**कायदा व सुव्यवस्था महाराष्ट्रात बिघडलेली आहे. प्रत्येक मिनिटाला गुन्हा घडतोय. मोठं मोठे गुन्हे असे घडत आहेत की महाराष्ट्राचा बिहार व्हायला वेळ लागणार नाही. महायुतीचं सरकार बहुमतानं आलेलं असेल आणि तुम्हाला जर ते सांभाळता येत नसेल. तुम्हाला जर राज्याला न्याय देता येत नसेल तर निश्चितच मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे. त्यांनी जर याप्रकरणी तातडीची पावलं उचलली नाहीत तर राज्यपालांना भेटून आम्हाला त्यांच्या राजीनाम्याची मागणी करावी लागेल, अशा शब्दांत तृप्ती देसाई यांनी मागणी केली आहे.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात रोज नवंनवे खुलासे होत आहेत. यात आता सामाजिक कार्यकर्त्या आणि भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख तृप्ती देसाई यांची एन्ट्री झाली आहे. देसाई यांनी याप्रकरणात अनेक गंभीर आरोप केले आहेत. तसंच याप्रकरणात मोक्का लावण्यात आलेला आरोपी वाल्मिक कराडला वाचवण्यासाठी प्रयत्न चालले असल्याचा दावा केला आहे. यामागे दिंडोरीच्या आश्रमाचे प्रमुख आण्णासाहेब मोरे ऊर्फ गुरुमाऊली यांचा संबंध असल्याचे पुरावे आपल्याकडं असल्याचं म्हटलं आहे.

तृप्ती देसाई यांनी पुण्यात माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला आणि नवा बॉम्ब टाकला. त्या म्हणाल्या, "आम्हाला खात्रीलायक माहिती अशी मिळाली आहे की, नाशिक जिल्ह्यातील दिंडोरीत जो आश्रम आहे तिथं १५ आणि १६ डिसेंबर रोजी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे हे मुक्कामाला होते, त्यानंतर १७ तारखेला ते या आश्रमातून निघाले.

नाशिक जिल्हा बीड आणि नगरपासून हे ठिकाण जवळ आहे. महाराष्ट्रात देशमुख हत्या प्रकरणावरुन एवढा गोंधळ सुरु असताना पोलिसांना हे आरोपी कसे सापडले नाहीत? दिंडोरीचं आध्यात्मिक स्थान आहे, तिथं त्यांना काय ठेवलं गेलं? त्यांना आश्रमाच्या प्रमुखांनी आश्रय दिला असेल तर सीआयडी आणि एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी याची चौकशी करायला हवी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे जेव्हा वाल्मिक कराड पुण्यात सरेंडर करणार होता. त्याच्या दोन ते तीन दिवस आधी सीआयडीचं पथक त्या आश्रमात गेलं होतं. तिथं सीसीटीव्ही कॅमेऱ्यात वाल्मिक कराड तिथं दिसून आला होता. पण हे सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी सीसीटीव्हीची माहिती का दिली नाही. हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला गेला, याचा तपास गृहमंत्र्यांनी केला पाहिजे.

वाल्मिक कराडनं मागच्या वर्षी या आश्रमात जे काही चुकीचे प्रकार घडत होते त्याप्रकरणी जानेवारी २०२४ मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना सह्याद्री अतिथीगृहात बैठक लावलेली होती. या बैठकीला आण्णासाहेब मोरे यांचे पुत्र चंद्रकांत मोरे उपस्थित होते. यावेळी वाल्मिक कराडं मध्यस्थी केल्यानं त्याचे हेच उपकार फेडण्यासाठी त्याला आश्रमात आश्रय दिला असावा. पण आमच्यापर्यंत ही माहिती येते पण पोलिसांना हे का कळलं नाही? असा सवालही तृप्ती देसाई यांनी केला आहे.






## बारामती जिल्ह्यासाठी हालचाली सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे, सातारा या जिल्ह्यांच्या पुनर्रचनातून बारामती जिल्ह्याची निर्मिती करण्याच्या जोरदार हालचाली राज्य सरकारकडून सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. याबाबत 26 जानेवारी रोजी घोषणा करण्यात येणार असल्याची चर्चेस जोर आला आहे. बारामती, शिरूर, माढा लोकसभा मतदारसंघातील काही तालुक्यांचा समावेश करून बारामती जिल्हा केला जाणार आहे. यात प्रामुख्याने पुणे जिल्ह्यातील पूर्व भाग म्हणजे भोर, पुरंदर, शिरूर, दौंड, इंदापूर तसेच सातारा जिल्ह्यातील फलटण, कोरेगाव, खंडाळा या तालुक्यांचा समावेश होण्याची शक्यता आहे. याविषयी संबंधित सर्वच राजकीय नेत्यांची भूमिका दुहेरी आहे. काहीजण सकारात्मक व काही नकारात्मक आहेत. त्यामुळे याबाबत निर्णय होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. बारामती जिल्हापूरक अशा बाबींमध्ये महावितरणचे विभागीय मुख्यधिकारी कार्यालय, स्वतंत्र

- **भोर, पुरंदर, शिरूर, दौंड, इंदापूर, खंडाळा, फलटण, कोरेगाव या तालुक्यांचा होणार समावेश**

परिवहन महामंडळ कार्यालय, अतिरिक्त पोलिस अधीक्षक कार्यालय याचबरोबर बारामती जिल्हा शोभेल असे सर्व बाजूंचे चौपदरी रस्ते, विमानतळासाठी जागा, मेडिकल का?लेजसह शैक्षणिक हब, कृषी हब, सर्व क्षेत्रांतील नामवंत सोने व्यापारी, हॉटेल्स, कापड दुकानदार, गाडी विक्रेते, औद्योगिकरणाचे जाळे, बारामती शहरातील रिंगरोड, 27 बाग-बगिचे येथे उपलब्ध आहेत. आता फक्त बारामतीला जिल्हा मानांकन देऊन जाहीर करण्याचे उरले आहे. बारामती जिल्हा निर्मितीमुळे अनेक तालुक्यांचे रखडलेले प्रस्तावही मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामध्ये काही तालुक्यांचा राजकीय कुरघोडी, डावपेच करून दबावात ठेवण्यासाठी तर काहीचा तालुक्याचा फायदादेखील होणार आहे.

# सैफवर हल्ला राजकीय कल्ला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर चाकू हल्ला झाल्याची माहिती मिळत आहे. घरात शिरलेल्या चोराकडून सैफ अली खानवर चाकू हल्ला करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. सध्या सैफला लिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर त्याच्या घरात घुसलेल्या चोरानं चाकू हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रात्री अडीचच्या सुमारास हा प्रकार घडला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सैफ अली खान याच्या मुंबईतील घरात बुधवारी रात्री एक चोर शिरला होता. चोराला पाहून सैफच्या घरातील कर्मचाऱ्यांनी आरडाओरड सुरू केला. त्यावेळी सैफ अली खानला जाग आली. खोलीतून बाहेर आल्यानंतर सैफ अली खान आणि चोर आमनेसामने आले. यावेळी चोरानं पकडलं जाण्याच्या भीतीनं त्याच्याकडील चाकूने सैफ अली खानवर सपासप वार केले. यामध्ये सैफ अली खानला दुखापत झाली आहे. त्याला तातडीनं मुंबईच्या लिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सैफ जखमी झाल्यानंतर घरातील नोकरांनी त्याला तातडीनं रुग्णालयात दाखल केलं. या गोंधळात चोरानं पळ काढला. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. मुंबई पोलिसांनी या घटनेची गंभीरतेनं दखल घेतली असून चोराला शोधण्यासाठी मुंबई गुन्हे शाखेचे पथक कामाला लागलं आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सैफ अली खानला तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्याच्यावर तातडीनं उपचार सुरू करण्यात आले. सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.

अभिनेता सैफ अली खान आणि त्याची पत्नी करिना कपूर वांद्रे येथे राहतात. त्यांच्या घरात रात्री एक चोर शिरला. सैफ-करिनाच्या घरात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना चोर शिरल्याची चाहुल लागली. त्यांनी आरडाओरडा सुरू केला. त्यानंतर सैफ अली खानला जाग आली. त्यानंतर सैफ अली खान आणि चोरामध्ये झटापट झाली आणि या झटापटीत सैफवर चोरानं चाकूनं वार केले आणि तिथून पळ काढला.

### मुंबईला असुरक्षित शहर म्हणणे चुकीचे

**चाकू हल्ल्याच्या खळबळजनक घटनेनंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मुंबईच्या सुरक्षा व्यवस्थेवर सवाल उपस्थित केले होते. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, "मला वाटते की, मुंबई हे देशातील सर्वात सुरक्षित शहरांपैकी एक आहे. हे खरे आहे की, कधीकधी काही घटना घडतात ज्या गांभीर्याने घेतल्या पाहिजेत. तथापि, या घटनेमुळे मुंबई असुरक्षित आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल, कारण अशा विधानामुळे शहराची प्रतिमा मलिन होते. मुंबई आणखी सुरक्षित व्हावी यासाठी सरकार निश्चितच प्रयत्न करेल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.**








# एस.टी.बस दुचाकी अपघातात ३ ठार

**जेजुरी- बेलसर फाटा उड्डाण पुलाजवळची घटना : दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास घडली घटना**

**पुणे (दै. आरंभ पर्व) : आळंदी पंढरपूर पालखी महामार्गावर बेलसर फाटा जवळ एस. टी. बस व दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकी वरील तिघे जण जागीच ठार झाल्याचे समजत आहे. या अपघातात रमेश किसन मेमाणे ( वय 60),संतोष दत्तात्रय मेमाणे (वय 40) व पांडुरंग दामोदर मेमाणे (वय 65) हे तिघे जण बोरमाळ वस्ती ,पारगाव मेमाणे ,ता पुरंदर जि पुणे येथील रहिवाशी आहेत. या बाबत माहिती अशी की सासवड जेजुरी रस्त्यावर बेलसर फाटा दरम्यान उड्डाण पुलाचे काम सुरू आहे. दुचाकीवर असणारे तिघे जण रस्ता क्रॉस करून जात असताना एस टी बस व या दुचाकीचा अपघात झाला. ही घटना दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास घडली. एस टी चालकाने गाडीचा वेग कमी करून बस रस्त्याच्या खाली घेण्याचा प्रयत्न केला मात्र दुचाकी गाडी बस खाली गेल्याने दुचाकीला फरफट नेले. या अपघातात दुचाकी वरील तिघेजण जागीच ठार झाले. तिघांना जेजुरीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिघांचा जागीच मृत्यू झाला होता.**





# इंडिया आघाडीची एक्स्पायरी डेट...

केंद्रातील सत्तेपासून भाजपाला रोखण्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या अगोदर स्थापन झालेल्या इंडिया नामक आघाडीची एक्स्पायरी डेट आता जवळ आली असून आघाडीतील प्रमुख पक्षच विसर्जनाची भाषा बोलू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत अब की बार ४०० पार अशी घोषणा देणाऱ्या भाजपाला इंडिया आघाडीने २४० जागांवर रोखले. पण नववर्षात इंडिया आघाडीला आपला गाशा गुंडाळण्याची वेळ आली. लोकसभा निवडणुकीत मिळालेले यश विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला टिकवता आले नाही. विशेषतः सत्तेवर येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या भाजपा विरोधी आघाडीची महाराष्ट्र व हरियाणा या दोन राज्यांत मोठी दुर्दशा झाली. इंडिया आघाडीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या काँग्रेसवर आणि काँग्रेसचे नेतृत्व करणाऱ्या राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर आघाडीतील प्रादेशिक पक्षांचा विश्वास राहिलेला नाही आणि काँग्रेस पक्षही आघाडीतील घटक पक्षांना ढुंकून विचारत नाही. दिवसेंदिवस बलाढ्य होत असलेल्या भारतीय जनता पक्षाला कॉंग्रेस स्वबळावर तोंड देऊ शकत नाही आणि भाजपाशी लढण्यासाठी काँग्रेस इंडिया आघाडीतील घटक पक्षांशी चर्चाही करीत नाही.

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने इंडिया आघाडीतील व राज्यात महाविकास आघाडीतील मतभेद उफाळून आले आहेत. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस हाच भाजपाचा राजकीय शत्रू नंबर १ आहे आणि दुसरीकडे इंडिया आघाडीतील घटक पक्ष काँग्रेसची झूल नि राहुल गांधींचे नेतृत्व झुगारून देण्याची भाषा बोलत आहेत. इंडिया आघाडीतील असंतोषाचा लाभ भाजपाला मिळतो आहे. म्हणूनच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा भाजपाला शतप्रतिशत यश मिळवून देण्याचा एल्गार पुकारत आहेत. इंडिया आघाडीची अवस्था आयसीयूमध्ये गेल्यासारखी आहे. ही वेळ आघाडीवर आणली कोणी ? लोकसभा निवडणूक निकालानंतर भाजपाला पुन्हा मोठे यश मिळू लागले आहे, त्यामुळे इंडियाचे नेते हबकले आहेत. इंडिया आघाडीवर विसर्जनाची पाळी राहुल गांधी यांच्या वागण्यामुळे आली आहे का, या प्रश्नाने कॉंग्रेसलाही निरूत्तर केले आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी म्हटले की, इंडिया आघाडीचा हेतू लोकसभा निवडणुकीत भाजपाला पराभव करणे इतकाच मर्यादित होता. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले की, भाजपा विरोधकांमध्ये एकजूट नाही. म्हणून इंडिया आघाडी बरखास्त केली पाहिजे. महाराष्ट्रातील उबाठा सेनेने तर, इंडिया आघाडीची गरज संपली असेल तर काँग्रेसने तसे जाहीर करावे, कोणत्या मार्गाने जायचे ते आम्ही ठरवू. इंडिया आघाडीची निर्मिती कशासाठी झाली होती? पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली देशभर भाजपाचा अश्वमेध चौफेर दौडत आहे, त्यामुळे अनेक राजकीय पक्षांचे अस्तित्वच धोक्यात आले. भाजपा विरोधी मतांचे विभाजन होऊ नये म्हणून इंडिया या बॅनरखाली पक्षांना एकत्र आणून भाजपाला रोखायची रणनिती आखण्यात आली. दि. १८ जुलै २०२३ रोजी बंगळूरु येथे काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, सपा, आम आदमी पक्ष आदी २६ राजकीय पक्ष एकत्र आले व त्यांनी आघाडी स्थापन केली.

इंडियन नॅशनल डेव्हलपमेंट इन्क्लुसिव्ह अलायन्स म्हणजेच इंडिया असे आघाडीचे नामकरण करण्यात आले. काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे यांना आघाडीचे अध्यक्ष करण्यात आले. सन २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला सत्तेतून हटवावयाचे हाच इंडिया आघाडीचा उद्देश होता. बंगळूरुच्या बैठकीत ममता बॅनर्जी यांनी आघाडीचे सारे कार्यक्रम, प्रचार मोहीम, प्रसिद्धी सर्व काही इंडिया या बॅनरखाली असेल असे जाहीर केले. पण आघाडी स्थापन झाल्यावर प्रादेशिक पक्षांकडून काही हादरे बसले, तर काही वेळा अपशकूनही झाले. इंडियाच्या स्थापनेनंतर सहा महिन्यांतच म्हणजे २४ जानेवारी २०२४ रोजी ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये लोकसभा निवडणूक आपला पक्ष स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केले. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस दुर्बल आहे. काँग्रेसने तृणमूल काँग्रेसकडे १०-१२ जागांची मागणी केली होती, पण ममता यांनी त्याला साफ नकार दिला. ममता बॅनर्जी इंडिया आघाडीतून बाहेर पडल्या नाहीत किंवा इंडियाशी त्यांनी कधी फारकत घेतली नाही. पश्चिम बंगालमध्ये मेरी मर्जी अशी त्यांची भूमिका कायमच ताठर राहिली आहे. ममता यांच्या स्वबळावरच्या घोषणेच्या पाठोपाठ बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी तर दि. २७ जानेवारी २०२४ रोजी इंडियाला राम राम केल्याची बातमी झळकली. एवढेच नव्हे तर त्यांनी थेट भाजपाप्रणीत एनडीएचा रस्ता धरला. ज्या नेत्याने इंडियाचा पाया रचला तोच भगव्या ब्रिगेडमध्ये निघून गेला.

ममता व नितीश कुमार यांचे मेरी मर्जी राजकारण भाजपाच्या पथ्यावरच पडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. १२ मे २०२४ रोजी बिहारमध्ये पाटण्यात केलेल्या रोड शोमध्ये बोलताना काँग्रेसला झोडून काढले. ते म्हणाले, केवळ एका परिवाराचे हित जपण्यासाठी व काहीही करून सत्ता काबीज करण्यासाठी विरोधी पक्षांची धडपड चालू आहे पण आम्ही ते साध्य होऊ देणार नाही. भाजपाने २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत २८२ जागा जिंकल्या. सन २०१९च्या निवडणुकीत भाजपाचे ३०३ खासदार निवडून आले. २०२४ च्या निवडणुकीत भाजपाने ४०० पारची घोषणा दिली होती. पण २०२४ च्या निवडणुकीत काँग्रेसची घोडदौड २४० वर थांबली, तर काँग्रेसच्या खासदारांच्या संख्येने शंभरी गाठली. काँग्रेसच्या यशात इंडिया आघाडीचा वाटा मोठा होता. सन २०१९ मध्ये लोकसभेतील एनडीएच्या खासदारांची संख्या ३६० होती, २०२४ मध्ये ती २९३ झाली. सन २०१९ मध्ये भाजपाच्या खासदारांची संख्या ३०३ होती, तर २०२४ मध्ये २४० वर थांबली. सन २०१९ मध्ये विरोधी आघाडीच्या खासदारांची संख्या ११९ होती, २०२४ मध्ये २३४ पोहोचली. २०१९ मध्ये काँग्रेसचे लोकसभेत ५२ खासदार होते, २०२४ मध्ये ही संख्या १०० झाली. लोकसभेत २०१४ व २०१९ मध्ये विरोधी पक्ष दुर्बल होता. विरोधी पक्ष नेताही नव्हता. २०२४ मध्ये विरोधी पक्ष मजबूत झाला. राहुल गांधी हे विरोधी पक्ष नेता आहेत. २०२४ च्या निवडणुकीत भाजपाने ५४३ पैकी ४४१ जागांवर स्वतःचे उमेदवार उभे केले होते. इंडिया आघाडीने ४६६ जागांवर भाजपाशी लढत दिली. आरक्षण, संविधान, महागाई व बेरोजगारी या मुद्द्यावर इंडिया आघाडीने प्रचारात भर दिला. भाजपाला संविधान बदलायचे आहे, म्हणून ४०० पारची घोषणा दिली आहे, असा प्रचार आघाडीने केला व त्याचा अपेक्षित परिणाम मतदानावर झाला. ऑक्टोबर २०२४ मध्ये हरियाणात विधानसभा निवडणूक झाली. या राज्यात आप आणि सपा दोन्ही पक्षांना निवडणूक लढवायची होती. पण काँग्रेसने त्यांना जागा सोडण्यास नकार दिला. काँग्रेसमधील गटबाजी व इंडियामध्ये फाटाफूट याने काँग्रेसची हरियाणात वाट लागली व भाजपाने पुन्हा सत्ता काबीज केली. महाराष्ट्रात महाआघाडीत सत्ता वाटपात शेवटपर्यंत घोळ चालू राहिला. लोकसभेत यश मिळाले म्हणून आघाडीला फाजिल आत्मविश्वास नडला.

काँग्रेस व उबाठा सेना अगोदरपासूनच मुख्यमंत्रीपदाच्या मुंडावळ्या घेऊन तयार होते. गाफील आघाडीवर भाजपाने मात केलीच पण लाडकी बहीण योजना व ओबीसींनी भाजपा-महायुतीला महाप्रचंड बहुमत दिले. महाआघाडीचे ५० आमदारही निवडून आणता आले नाहीत मग इंडिया हवीच कशाला, अशी खदखद सुरू झाली. लोकसभेत अखिलेश यादव हे अगोदर पुढील रांगेत बसायचे, पण संसदेच्या हिवाळी अधिवेशनात त्यांना मागे ३५५ क्रमांकाचे आसन मिळाले. अखिलेश यांनी धन्यवाद अशी प्रतिक्रिया देऊन नाराजी व्यक्त केली. हरियाणा व महाराष्ट्रातील पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी इंडियाची निर्मिती आपण केली, पण आघाडीचे नेतृत्व बरोबर नाही, मला संधी मिळावी अशी टीप्पणी केली. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्र, हरियाणा, जम्मू-काश्मीर आणि झारखंड या चारही राज्यांत काँग्रेसचा जबर पराभव झाला. दिल्लीत कॉंग्रेस व आप एकमेकांच्या विरोधातच लढत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसला जनतेचा विश्वास मिळवता आला नाही आणि इंडियातील मित्रपक्षांचाही कॉंग्रेसवर विश्वास राहिलेला नाही. सन २०२५ मध्ये दिल्ली आणि बिहार, सन २०२६ मध्ये आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू व केरळ, सन २०२७ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक आहे. गेल्या सात महिन्यांत इंडिया आघाडीची बैठकच झाली नाही. कोणाची कोणाला गरज वाटत नाही.

# 'स्वर्गीय सुभाष आण्णा चौधरी' जलकुंभ नागरिकांच्या सेवेत!

## सचिन दोडकेंच्या प्रयत्नातून वारजेकरांना मुबलक पाणीपुरवठा होणार!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारजे परिसरातील पाण्याचा प्रश्न मिटविण्यासाठी तत्कालीन नगरसेवक सचिन दोडके यांनी पाठपुरावा करत हाती घ्याल ते तडीस न्या हा बोध दिला आहे.

दोडके यांनी वारजे माळवाडी परिसर हा मोठ्या प्रमाणावर पुढील काही वर्षात वाढणार हे ओळखून परिसरातील पाण्याची गरज भागवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज भासणार हे लक्षात घेऊन सन २०१६ साली पुणे महानगर पालिकेच्या २४/७ या योजने अंतर्गत हा २२ लक्ष लिटर साठवून क्षमता असलेला जलकुंभ मंजूर करून घेतला.



गेले कित्येक वर्ष या कामासाठी दोडके आग्रहीपणेपुणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा करत होते. सात वर्ष अनेक अडचणींवर मात करत हे जलकुंभाचे काम पूर्णत्वास आले .

नुकतेच वारजे येथील डुक्कर खिंड येथील 'स्वर्गीय सुभाष आण्णा चौधरी' पाण्याच्या टाकीचे लोकार्पण नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आले. अत्यंत साधेपणाने मात्र उत्साहामध्ये हा शुभारंभ करण्यात आला. शिवाय या

जलकुंभातून पाणीपुरवठाही सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे वारजे माळवाडी परिसरातील नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा होणार आहे.

झपाट्याने वाढणारे शहरीकरण आणि त्यामुळे वाढणाऱ्या विविध समस्या भेडसावत असतात. मात्र लोकप्रतिनिधी म्हणून भविष्याचा विचार करून योजना राबवणे हे एक आदर्श लोकप्रतिनिधीचे उदाहरण ह्या निम्मित दिसून येत असल्याची प्रचिती यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

"वारजे बद्दलंतय"या टॅग लाईनच्या माध्यमातून वारजे माळवाडी परिसरातील विकास कामे केली.ही कामे करत असताना नागरीकांच्या असलेल्या मुलभूत गरजा वरती काम करणे हे तितकेच महत्त्वाचे असते. पाणी ही आपली मूलभूत गरज आहे हे ओळखून आपण काम केलं.वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने नगरसेवक म्हणुन पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी सुमारे ७ वर्षापुर्वी घेतलेला निर्णय आज यशस्वी झाला याचा अपार आनंद झाला.

आज नक्की याचा अभिमान वाटत असल्याचे मत मा.नगरसेवक सचिन दोडके यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

नागरिकांच्या सेवेत दाखल झालेल्या या जलकुंभाच्या माध्यमातून आदित्य गार्डन, व्हिल यु, साई सयाजी नगर, रेणुकानगर, उरीटनगर, रुणवाल सोसायटी, एकदंत कॉलनी, छत्रपती शाहु महाराज वसाहत, म्हाडा व आसपासच्या भागात आजपासुन पाणी पुरवठा होणार आहे. यावेळी उपस्थित नागरिकांनी मा. नगरसेवक सचिन दोडके यांचे आभार मानले.

## वाहतुकीचे तीनतेरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाढती वाहनसंख्या ही जगातल्या सगळ्याच राष्ट्रांची डोकेदुखी ठरत आहे. पण या प्रचंड वाहनसंख्येमुळे होणारी वाहतूक कोंडी ही त्याहूनही गंभीर समस्या ठरते आहे. अशा कोंडीने हैराण झालेल्या जगातील पहिल्या पाच शहरांमध्ये पुणे शहराचा समावेश व्हावा, यात नवल ते काय? गेल्या पाच दशकांत या शहराची वाढ ज्या गतीने होते आहे, त्याकडे शहराच्या कारभाऱ्यांनी कधीचे गांभीर्याने लक्ष दिले नाही. त्याचाच हा परिणाम. शहराच्या भौगोलिक रचनेशी त्याचा जेवढा संबंध तेवढाच येथील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशीही. एका टोकाहून दुसऱ्या टोकाला जाण्यासाठी शहराच्या मध्यातून जाण्याशिवाय पर्याय नसलेले पुणे हे शहर आहे. तेथे शहराबाहेरून जाणाऱ्या वर्तुळाकार मार्गाची कल्पना पुढे येऊन दशके लोटली. प्रत्येक वेळी ते दृष्टिपथात येईयेईपर्यंत क्षितिजापार जाणारे स्वप्न ठरले आहे. कदाचित असा वर्तुळाकार मार्ग तयार झालाच तर? अशा स्वप्नात पुणेकरांना गुंगवून ठेवण्यात मात्र कारभाऱ्यांना निश्चित यश आले आहे. पुण्याचे सध्याचे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील यापूर्वी जेव्हा पुणे पोलिसांमध्ये वाहतूक विभागात कार्यरत होते, तेव्हा त्यांच्या पुढाकाराने जंगली महाराज रस्ता आणि फर्गसन रस्ता एकेरी करण्याची योजना साकार झाली. त्यावेळी त्यास कडाडून विरोध करणाऱ्यांना आज इतक्या वर्षांनंतर तरी त्याची फलश्रुती मान्य होण्यास हरकत नाही. आत्ताही मनोज पाटील यांनी शहराच्या वाहतुकीबाबत जो अभ्यास केला आहे, तो थक्क करणारा आहे. प्रश्न आहे तो, हा अभ्यास कृतीत उतरण्याचा. तसे चुकून माकून झालेच तर या शहराचा वाहतूक कोंडीचा प्रश्न काही अंशी तरी सुटू शकेल. सध्या पुणे महानगरपालिकेत कारभारी अस्तित्वातच नसल्याने सारा कारभार प्रशासनाच्या हाती आहे.

# हर्षल कोठावदे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान

## सामाजिक भान म्हणून जेष्ठ पत्रकारांच्या उपचारासाठी निधी संकलन

**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील विशेष करून कोथरूड भागात समाजकार्यात सदैव अग्रणी असलेल्या नवचेतना युवा मंच यांच्याकडून यावर्षी पत्रकार दिनानिमित्त पत्रकार सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये c24 तास या वृत्तवाहिनीचे पुणे प्रतिनिधी हर्षल कोठावदे यांना आदर्श आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात.

या कार्यक्रमाला निवृत्त माजी पोलीस महानिरीक्षक विठ्ठल जाधव तसेच मुंबई मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र हुंजे, उद्योजक सचिन वाघमारे, उद्योजक उद्धव धुमाळे यांच्यासह आदी मान्यवरांच्या




हस्ते हर्षल कोठावदे यांच्यासह पत्रकारांच शाल, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन पौड रस्त्यावरील वनाझ परिसर हॉल या ठिकाणी करण्यात आले होते.

आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाचे जपणूक करत नवचेतना युवामंच गेल्या अनेक वर्षापासून समाजामध्ये सक्रिय असून, आतापर्यंत त्यांनी अनेक समाज उपयोगी कार्यक्रम केले आहेत. समाजातील विविध घटकांना सन्मानित करण्याचा त्यांचा उद्देश नेहमीच राहिला असून, यावेळी त्यांनी पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन केले. याप्रसंगी निवृत्त माजी पोलीस महानिरीक्षक विठ्ठल जाधव तसेच मुंबई मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र हुंजे यांसह आदी मान्यवरांच्या हस्ते पत्रकारांना सन्मानित करण्यात आले.

c24 तास या युट्युब न्यूज चॅनलच्या माध्यमातून गेले दहा वर्षाहून अधिकाळ ते कार्यरत आहेत . विविध प्रश्नावरती त्यांनी आवाज उठविला याबद्दल त्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

भविष्यातही जनतेच्या प्रश्नांना आवाज देण्याचा नक्की प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया कोठावदे यांनी पुरस्काराला उत्तर देताना केली आहे.

## भारतीय पर्यटन विकास सहकारी संस्थेच्यावतीने

# पाचवा पुणे पर्यटन महोत्सव १७ ते १९ जानेवारीला

- **प्रवीण घोरपडे यांची पत्रकार परिषदेत माहिती**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन विकासासाठी भारतीय पर्यटन विकास सहकारी संस्थेच्या वतीने आयोजिला जाणारा 'पुणे पर्यटन महोत्सव' अर्थात पुणे ट्रॅव्हल फेस्टिवल यंदा १७ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत हॉटेल सेंट्रल पार्क, डेक्कन पुणे येथे होणार आहे. येत्या शुक्रवारी (दि. १७) सकाळी १०.३० वाजता या महोत्सवाचे उद्घाटन होणार असून, तीनही दिवस हा महोत्सव सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्व पुणेकरांसाठी विनामूल्य खुला




राहणार आहे, अशी माहिती भारतीय पर्यटन विकास सहकारी संस्थेचे चेअरमन प्रवीण घोरपडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे सचिव प्रथमेश कुलकर्णी, खजिनदार हेमंत जानी, संचालक संतोष माने, सजेश पिल्ले, आशिष हिंगमिरे, अमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

प्रवीण घोरपडे म्हणाले, "पुणे पर्यटन महोत्सवाचे यंदा पाचवे वर्ष आहे. या महोत्सवात पुण्यातील नामांकित ६० पेक्षा अधिक पर्यटन कंपन्या आपले सहलींचे पर्याय सादर करणार आहेत. त्याशिवाय विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या महोत्सवासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी), पर्यटन संचालनालय, पर्यटन मंत्रालय, पुणे विमानतळ प्रशासन, पुणे रेल्वे स्टेशन, पासपोर्ट कार्यालय, मेट्रो प्रशासन, पीएमपीएल प्रशासन, ट्रॅव्हेल एजन्सी असोसिएशन्स, हॉटेल रेस्टोरंट असोसिएशन्स, रिसॉर्ट्स असोसिएशन, कृषी पर्यटन असोसिएशन, लोकल टूर गाईड्स, इव्हेंट मॅनेजमेंट आदी विभागातील पदाधिकारी व अधिकारी यांना निमंत्रित केलेले आहे. राज्याच्या पर्यटन विकासासाठीच्या या महोत्सवात विविध मान्यवर चर्चा करणार आहेत."

यासह देशविदेशातील सहलींचे विविध पर्याय एकाच छताखाली असणार आहेत. कोकणापासून कॅलिफोर्नियापर्यंतच्या असंख्य सहलींचे नियोजन इथे करून घेता येणार आहे. तसेच महोत्सव कालावधीत बुकिंग करणाऱ्या पर्यटकांना खास सवलती मिळणार आहेत. महोत्सवात रोज लकी ड्रॉ काढण्यात येणार असून, अनेक पर्यटन कंपन्यांकडून विविध योजना सादर केल्या जाणार आहेत. त्यामुळे अधिकाधिक पुणेकर व परिसरातील नागरिकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही प्रवीण घोरपडे यांनी केले.

# थोडक्यात



## लोकमंगल पतसंस्थेच्या सल्लागारपदी सचिन सुंबे यांची निवड

**लोणी काळभोर (आरंभ पर्व) :** सोलापूर येथील लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित लोणी काळभोर शाखेच्या सल्लागारपदी पत्रकार सचिन लक्ष्मण सुंबे यांची निवड करण्यात आली. तसे निवडीचे पत्र शाखाधिकारी मारुती चौगुले यांनी त्यांना दिले. सचिन सुंबे यांच्या बरोबर तुषार काळभोर , भास्कर शेलार ,दत्तात्रय कुंभार , मनोज गायकवाड, ज्ञानेश्वर बिराजदार , रोहन सपकाळ ,उदय काळभोर , अनिल कांबळे, शिवाजी किलकिले , संदीप बोडके ,नितीन गाढवे व बाळू पाटील यांची निवड करण्यात आली . यावेळी सल्लागारांना नियुक्तीपत्रक व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला . पत्रकार दिनाचे औचित्य साधून परिसरातील पत्रकारांचा सत्कार करण्यात आला यावेळी संचालक शिवाजी माळी, विभागीय अधिकारी कमलाकर पाटील, शाखाधिकारी मारुती चौगुले व सल्लागार उपस्थित होते . लोकमंगल पतसंस्थेने आमदार व संस्थापक /अध्यक्ष सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात भरारी घेतली असून महाराष्ट्रातील एक अग्रगण्य पतसंस्था आहे . पतसंस्थे मध्ये १२०० कोटींच्या ठेवी असून ९०० कोटीचें कर्ज वाटप केले आहे .संस्थेने अनेक योजना अमलांत आणल्या असून त्यामध्ये लखपती ठेव , धनवृद्धी ठेव , लोकमंगल सुकन्या ठेव ,त्रैवार्षिक ठेव योजना अशा योजनांमुळे लोकमंगल पतसंस्था महाराष्ट्रात नावारुपाला आली आहे अशी माहिती संचालक शिवाजी माळी यांनी यावेळी दिली .सचिन सुंबे यांच्या निवडीमुळे परिसरातुन त्यांचे अभिनंदन केले जात आहे .

## पानिपत शौर्य दिनानिमित्त मराठा वीरांना आदरांजली

**पुणे (आरंभ पर्व) :** पानिपत युद्धाचा हा 265 वा स्मृतिदिन व पानिपतच्या युद्धात बलिदान देणाऱ्या मराठा वीरांना महादजी शिंदे छत्री, वानवडी येथे पानिपत शौर्य दिनानिमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. त्याचप्रमाणे ग्वाल्हेरच्या महाराणी व ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या मातोश्री माधवीराजे सिंधिया यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पानिपत शौर्य दिन कार्यक्रमाचे आयोजन उत्तमराव शिंदे सरकार यांच्यावतीने करण्यात आले होते . यावेळी सदानंदजी मोरे ( जगतगुरु संत तुकाराम महारानांचे वंशज, इतिहास तज्ञ), पांडुरंगजी बलकवडे (ज्येष्ठ इतिहास तज्ञ), प्रशांतजी जगताप ( माजी उपमहापौर, पुणे मनपा), अँड विकास खामकर (विद्यमान अध्यक्ष, पुणे बार असोसिएशन) , अँड विकास ढगे पाटिल (माजी अध्यक्ष, पुणे बार असो), आबासाहेब पाटिल (प्रसिद्ध शिवव्याख्याते), रणवीर सत्यपाल शिंदे सरकार (नाशिक), राजाभाऊ राऊत (उद्योजक ), राजाभाऊ कोटमे (व्यवस्थापक, कोटमगाव ), माजी आमदार जगदिराजी मूळीक. मोहनरावजी शिंदे सरकार, विशाल पाटिल, अँड प्रवीण जी गायकवाड, चंद्रकांत शितोळे , उत्तमरावजी मांढरे, यशवंतजी भोसले, प्रा. प्रकाश दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. महापराक्रमी महाराज महादजी शिंदे यांच्या मंदिरातील पुतळ्यास मान्यवरांकडून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नंतर मान्यवरांच्या शुभहस्ते पानिपतच्या पवित्र मातीचे कलशपूजन केले. स्वर्गीय राजमाता माधवीराजे माधवरावजी सिंदिया यांना आदरांजली अर्पण करण्यात आले. सदानंदजी मोरे ( जगतगुरु संत तुकाराम महारानांचे वंशज, इतिहास तज्ञ) यांनी या वेळी पानिपत युद्धाची गाथा काही अनुभव सांगितले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजक उत्तमराव शिंदे सरकार आणि स्थानिक नागरिकांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## थोडक्यात



### चाकण शिक्रापूर मार्गावर कंटेनरची आठ वाहनांना धडक

पिंपरी (आरंभ पर्व) : चाकण-शिक्रापूर मार्गावर एका कंटेनरने पोलिसांच्या वाहनासह आठ वाहनांना धडक दिली.यात एका लहान मुलीसह पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने वेळेतच वाहनातून उडी मारल्याने त्याचा जीव वाचला आहे.नागरिकांनी कंटेनर चालकाला पकडून चोप दिला आहे.ही घटना गुरुवारी ( १६ जानेवारी) दुपारी साडेबाराच्या सुमारास तळेगाव चौकात घडली. दरम्यान,कंटेनर चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांचे म्हणणे आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन वैद्यकीय चाचणीसाठी नेले आहे. याबाबत माहिती अशी कि,चाकण येथून शिक्रापूरकडे जाणाऱ्या कंटेनर ट्रकने तळेगाव चौकात एका दुचाकीला धडक दिली. त्या दुचाकीवर दोन महिला आणि एक ११ वर्षीय मुलगी जात होत्या.कंटेनरने धडक दिल्याने दुचाकीवरील महिला आणि मुलगी रस्त्यावर पडल्या.मुलीच्या पायावर कंटेनरचे चाक गेले आणि त्यात ती गंभीर जखमी झाली.अपघात झाल्यानंतर कंटेनर शिक्रापूरच्या दिशेने निघून गेला. तसेच तो रस्त्यात आणखी वाहनांना धडक देत असल्याची माहिती चाकण पोलिसांना मिळाली. कंटेनरने पुढे जात असताना सुरुवातीला एका कारला धडक दिली. यात कारचे मोठे नुकसान झाले.अपघात झाल्यानंतर थांबण्याऐवजी चालकाने कंटेनर तसाच पुढे नेला. त्यामुळे पोलिसांनी कंटेनरचा पाठलाग सुरू केला. पुणे ग्रामीण पोलिस दलाच्या अंतर्गत असलेल्या शिक्रापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वाजेवाडी येथे कंटेनर चालकाला पकडण्यात यश आले. दरम्यान कंटेनरने सुमारे सात ते आठ वाहनांना धडक दिली. चाकण आणि शिक्रापूर पोलिसांनी वाजेवाडी येथे रस्त्यात डंपर आडवा लावून कंटेनर अडवला. त्यानंतर नागरिकांनी कंटेनर चालकाला चांगला चोप दिला. त्यात कंटेनर चालक जखमी झाला आहे. कंटेनरने पोलिसांच्या वाहनाला देखील धडक दिली असून त्यामध्ये एक वॉर्डन जखमी झाला आहे.

### सायबर चोरट्यांकडून दोघांची २८ लाखांची फसवणूक

पुणे (आरंभ पर्व) : जादा कमाईचे आमिष आणि अर्धवेळ नोकरीच्या आमिषाने सायबर चोरट्यांकडून हडपसर परिसरातील दोघांची २८ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. जादा कमाईचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एकाला तब्बल १५ लाख १५ हजारांचा ऑनलाईन गंडा घातला. ही घटना १० सप्टेंबर ते ११ नोव्हेंबर २०२३ कालावधीत हडपसरमध्ये घडली आहे. याप्रकरणी दर्शन धार्मिक (वय ४३) यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार हडपसर पोलिसांनी मोबाइलधारक चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दर्शन हे हडपसरमध्ये राहायला असून, सायबर चोरट्यांनी १० सप्टेंबर २०२३ मध्ये त्यांना दूरध्वनी केला. त्यांचा विश्वास संपादित करून वेळोवेळी प्रीपेड टास्क देऊन पूर्ण करण्यास सांगितले. त्याबदल्यात किरकोळ स्वरूपात परतावा दिला. त्यामुळे दर्शन यांनी गुंतवणूक करण्यास सुरूवात केली. सायबर चोरट्यांनी त्यांना जादा कमाईचे आमिष दाखविल्यांनतर दर्शनने वेळोवेळी गुंतवणूक केली. तब्बल १५ लाखांहून अधिक रकमेची गुंतवणूक केल्यानंतरही त्यांना परतावा मिळाला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यांनतर त्यांनी तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक अमर काळंगे पुढील तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेमध्ये अर्धवेळ नोकरीच्या आमिषाने तरुणाला १३ लाख ४८ हजारांचा ऑनलाईन गंडा घातला. ही घटना २४ मे ते २६ सप्टेंबर २०२४ कालावधीत हडपसर परिसरात घडली आहे. याप्रकरणी सतीश रासकर (वय ४९, रा. हडपसर) यांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार रासकर हे हडपसरमध्ये राहायला असून आरोपीसोबत त्यांची ओळख झाली होती. २४ मे २०२४ रोजी आरोपींनी त्यांना अर्धवेळ नोकरीचे आमिष दाखविले. त्यासाठी काही रक्कम द्यावी लागेल, तरच नोकरी मिळेल असे सांगितले. नोकरीसाठी रासरकर यांनी रक्कम आरोपीच्या बँक खात्यात वर्ग केली. वेळोवेळी रक्कम जमा करीत तब्बल १३ लाखांहून अधिक रक्कम जमा केल्यांनतरही त्यांना नोकरी मिळाली नाही. फसवणूक झाल्याप्रकरणी रासकर यांनी तक्रार नोंदविली असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील पुढील तपास करीत आहेत.




### ऑनलाइन जुगार खेळण्यासाठी बहिणीच्या घरी चोरी

पिंपरी (आरंभ पर्व) : पाच एकर शेतजमीन विकून जुगारात हारल्यानंतर पुण्यात येऊन घरपोच खाद्यपदार्थ पुरविण्याचे काम (डिलिव्हरी बॉय) करणाऱ्या तरुणाने ऑनलाइन जुगार खेळण्यासाठी बहिणीच्या घरी चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी आरोपीला अटक केली असून त्याच्याकडून एक लाख ३७ हजार रुपयांचे १२५ ग्रॅम दागिने हस्तगत केले. श्रीकांत दशरत पांगरे (वय २९, रा. कुंभेजळगाव, गेवराई, बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाल्हेकरवाडी येथील एका हौसिंग सोसायटीत १३ जानेवारी रोजी दुपारी घरफोडी झाली होती. याबाबत चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू होता. पोलिसांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. घराचा मागील दरवाजा, लोखंडी कपाटाची कोणत्याही प्रकारची तोडफोड झाली नसल्याचे आणि दरवाजाची आतील कडी बाहेरुन हात घालून उघडणे शक्य नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले.

# G-20 शिखर परिषदेसाठी दिखावा

## खडकवासला धरणामागील रस्त्यावर लावलेले पथदिवे बंदच

- पुणे मनपाच्या विद्युत विभागाचे दुर्लक्ष



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

धरणाच्या मागच्या बाजूला असलेल्या रस्त्याच्या कडेने G-20 शिखर परिषदेच्या निमित्ताने बसविण्यात आलेले अनेक पथदिवे सध्या बंद स्थितीत आहेत. पालिकेच्या विद्युत विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने रात्रीच्या वेळी रस्त्यावर काळोख राहत असून नागरिकांची गैरसोय होत आहे.मागील वर्षी G-20 परिषदेच्या निमित्ताने खडकवासला धरणाच्या मागच्या बाजूला लाखो रुपये खर्च करून पालिकेने पथदिवे बसविले होते. जागोजागी रंगरंगोटी करण्यात आली होती. कोणाचीही मागणी नसताना ही या रस्त्याच्या सुशोभीकरणासाठी लाखो रुपये खर्च करण्यात आले होते. मात्र सद्यःस्थितीत या पथदिव्यांपैकी बहुतांश पथदिवे बंद स्थितीत असल्याचे दिसत आहे. पर्यटक, स्थानिक नागरिक, नोकरदार, महिला यांची या रस्त्यावरुन रात्रीच्या वेळी ये-जा सुरू असते. रस्त्यावर अंधार असल्याने व रस्त्याच्या दुतर्फा मोठमोठी झाडे असल्याने असुरक्षित परिस्थितीत नागरिकांना ये-जा करावी लागत आहे. त्यामुळे पालिकेच्या विद्युत विभागाने गांभीर्य ओळखून तातडीने पथदिवे दुरुस्त करून घेणे आवश्यक आहे.

> “अनुचित घटना घडण्याच्या अगोदर पालिकेने लक्ष देणे आवश्यक आहे. किमान आहेत त्या सुविधा तरी व्यवस्थित मिळतील याची काळजी पालिकेने घ्यावी.” - सौरभ मते, माजी सरपंच खडकवासला
>
> “किरकोळ दुरुस्तीकडे पालिका लक्ष देत नसेल तर नवीन कामांची अपेक्षा करणे दूरच आहे. तातडीने दुरुस्ती करुन पथदिवे सुरू करण्यात यावेत.”
>
> - सुमित शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार खडकवासला विधानसभा मतदारसंघ युवक उपाध्यक्ष



## एनईओएस टेलीस्टार : फक्त ४८ तासांत विकले ५० युनिट्स

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बाजारपेठेवरील वर्चस्वाचे दमदार प्रदर्शन करत, सिन्टेल बाय अरविंदने एनईओएस टेलीस्टार आयपी पीबीएक्स सिस्टिम हे आपले नवीन उत्पादन सादर करून यशाची नवी व्याख्या रचली आहे. बुकिंग्स सुरु झाल्यापासून अवघ्या दोन दिवसात कंपनीने तब्बल ५० युनिट्स विकून एक लक्षणीय टप्पा गाठला आहे. आपले वर्चस्व अधिक मजबूत करत उद्योगक्षेत्रातील नावीन्यामध्ये नवा मापदंड स्थापित केला आहे. एनईओएस टेलीस्टार आयपी पीबीएक्समध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, अखंडित एकत्रीकरण आणि इंट्यूटिव्ह डिझाईन यांचा मिलाप आहे, जो आधुनिक व्यवसायांच्या सातत्याने बदलत्या गरजा पूर्ण करतो. ऑक्टोबर २०२४ मध्ये मुंबई आणि दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमामध्ये या क्रांतिकारी उत्पादनाचे अनावरण करण्यात आले. तब्बल ३०० सहयोगी आणि वितरकांचे लक्ष या उत्पादनाने वेधून घेतले. जानेवारी २०२५ मध्ये बुकिंग्सना सुरुवात होईपर्यंत एनईओएस टेलीस्टार हे बिझनेस कम्युनिकेशनसाठी गोल्ड स्टॅन्डर्ड बनण्याच्या मार्गावर होते. छोट्या टीम्सपासून मोठ्या व्यवसायांपर्यंत ही सिस्टिम १६ ते ६७० पोर्ट्सना (आयपी+टीडीएम) सपोर्ट करते, विविध आवश्यकता सहजपणे पूर्ण करते आणि एईएस-२५६ बिट एन्क्रिप्शन आणि सुरक्षित कम्युनिकेशनसाठी टीएलएस/एसआरटीपीसोबत प्रगत करता येते.

## शाळेतील रोखपाल महिलेकडून १६ लाखांचा अपहार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



शाळेतील रोखपाल महिलेने १६ लाख ६९ हजार रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी रोखपाल महिलेविरुद्ध लोणी काळभोर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.याबाबत शाळेच्या संचालकांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शाळेतील रोखपाल महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपहार केल्याचा प्रकार १० जानेवारी २०२३ ते २१ जून २०२४ या कालावधीत घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेली महिला लोणी काळभोर भागातील एका शाळेत रोखपाल होती. प्राथमिक, पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांनी शैक्षणिक शुल्क, तसेच गणवेशासाठी दिलेले शुल्क शाळेतील प्रशासनाकडे जमा करण्यात आले होते. रोखपाल महिलेने १४ लाख ४५ हजार रुपयांचा अपहार केला. लेखापरीक्षणात महिलेने अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. शाळेतील संचालकांच्या दालनात तिने प्रवेश केला. कप्प्यात ठेवलेली दोन लाख ४४ हजार रुपयांची रोकड, तसेच हिशेबाची पुस्तके, पावत्या चोरुन नेल्या, असे संचालकांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार तपास करत आहेत.

## हायटेक इमारतीच्या पूर्णत्वासाठी वाढीव निधी मिळावा

### आमदार शेखर निकम यांनी केली परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मागणी

**चिपळूण : विलास गुरव (दै. आरंभ पर्व)**



कोकणातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या चिपळूण बसस्थानकाच्या नव्या हायटेक इमारतीच्या कामाला ८ वर्ष उलटली तरी प्रकल्पाचा पाया तयार झालेला नाही. तेव्हापासून बसस्थानकाचा कारभार एका पत्र्याच्या शेडखाली चालविला जात आहे. प्रवाशांना-विद्यार्थ्यांना उभे राहण्यासाठी जागा नाही, आवारात इतर सोयीसुविधा नाहीत. यामुळे एस. टी. च्या वाहन चालकांसह प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत संताप व्यक्त केला जात असून या मध्यवर्ती बसस्थानकाच्या पूर्णत्वासाठी वाढीव निधीची तरतूद व्हावी, अशी मागणी आ. शेखर निकम यांनी परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे मुंबईत प्रत्यक्ष भेटीत केली आहे. यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन हा विषय मार्गी लावण्याचे परिवहन मंत्र्यांनी ग्वाही दिली आहे.

या निवेदनानुसार चिपळूण मध्यवर्ती बसस्थानक इमारत नूतनीकरणाच्या कामाची महानिविदा प्रक्रिया सन २०१६ मध्ये निघाली होती. सदर काम एका कंपनीला मिळाले होते. त्यांनी ते सन २०१९ पर्यंत होते. इमारतीच्या पायाचे अर्धे काम करुन काम परवडत नाही म्हणून अर्धवट स्थितीमध्ये सोडून दिले. त्यानंतर महामंडळाने सदर कामाचा ठेका संबंधित कंपनीकडून काढून घेतला.

तद्नंतर नवीन निविदा चिपळूण बसस्थानकाची पुनर्बांधणी करणे या नावाने दि. ०८ डिसेंबर २०२० या वर्षात ३ तीन कोटी ७० लाख रुपयाची संकेत स्थळावर जाहीर केली. परंतु सदर कालावधीमध्ये कोरोना महामारीमुळे व महामंडळाकडे निधी उपलब्ध नसल्याने सदर निविदा मंजूरीसाठी २० महिन्यांचा कालावधी गेला.

त्यानंतर माहे जुलै मध्ये या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला. परंतु अद्यापही चिपळूण मध्यवर्ती बसस्थानक इमारतीचे नुतनीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही. तरी या विषयाकडे लक्ष देऊन हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी आमदार शेखर निकम यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.

## योगा विश्वविक्रमासाठी डीईएस प्राथमिक शाळा सज्ज

- विद्यार्थी व पालकांच्या उत्साहाला आले जोरदार उधाण



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या डीईएस प्राथमिक शाळेमध्ये दि. १८ जानेवारी २०२५ रोजी १२०० विद्यार्थी प्राचीन ते आधुनिक काळापर्यंतचे विविध योगा सादर करीत विश्वविक्रम प्रस्थापित करणार आहेत. या उपक्रमात विद्यार्थ्यांसह पालकदेखील सहभागी होणार आहेत. डीईएस प्राथमिक शाळेत पहिल्यांदाच एव्हढ्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या आयोजनासाठी शाळेत जय्यत तयारी करण्यात येत असून, विद्यार्थ्यांचा जोरदार सराव सध्या सुरू आहे. या उपक्रमासाठी शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या उत्साहाला मोठ्या प्रमाणात उधाण आल्याचे दिसून येत आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आहारामध्ये योग्य तो बदल करून त्यासंदर्भात विशेष काळजी घेण्यात येत आहे, अशी माहिती डीईएस प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना धनावडे यांनी दिली. डीईएस प्राथमिक शाळेत गेल्या दोन वर्षांपासून योगाचे नियमितपणे प्रशिक्षण दिल्या जात आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी तसेच अनेक पालकदेखील सहभागी झालेले आहेत. शाळेच्या वतीने काहीतरी आगळेवेगळे करण्याच्या उद्देशाने यंदा योगाचा विश्वविक्रम करण्याचा निर्णय शाळा व्यवस्थापनाने आणि शिक्षकांनी घेतला. त्यातून मग विश्वविक्रमाची संकल्पना समोर आली. या उपक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना धनावडे, शाळा समिती अध्यक्ष अ‍ॅड. राजश्री ठकार, योग शिक्षिका योगिनी कानडे, तसेच उपक्रमाचे सल्लागार डॉ. मिलिंद संपगावकर हे ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी झटत आहेत. १५० मिनिटांमध्ये विद्यार्थी वेगवेगळी शारीरिक योगाचे ३० उपक्रम सादर करणार आहेत. या विश्वविक्रमात १२०० विद्यार्थी काल योग, सूर्यनमस्कार, चंद्रनमस्कार, ट्रायबल योगा, ॲनिमल योगा, बर्ड पोजेस, दंड योग, पार्टनर योगा, रिव्होल्यूशनरी पोजेस, तालीयोग, ह्विदमिक योगा, इक्विमेंट योगा, थेरा बँड योग, ब्रिक्स योग, चेअर योगा, मेडिसनल बॉल योगा, योगा फॉर स्पोर्ट्स, डान्स योगा, पॅट्रियॉटिक मंडल योग, ॲक्वा योगा, स्पिरिच्युअल योगा आणि पावर योगा सादर करणार आहेत. याच कार्यक्रमात पालकांच्या ढोलताशा पथकाचे संचलन होईल.

## वाहन चोरी करणारे दोघे अटकेत



**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

गुन्हे शाखेने वाहन चोरी करणाऱ्या दोघांना अटक केली असून, त्यांच्याकडून सहा लाख ५५ हजार रुपये किमतीच्या आठ दुचाकी जप्त केल्या आहेत. रफिक उमर जमादार (वय ३७, रा. मोशी), नीलेश मनोहर गायकवाड (वय ३०, रा. चिखली) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, चिखली पोलीस ठाण्यात वाहन चोरीचा एक गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेकडून केला जात होता. सराईत गुन्हेगार रफिक आणि नीलेश यांनी चोरी केलेल्या दुचाकी विक्री करण्यासाठी केएसबी चौक आणि एमआयडीसी ब्लॉक दोन येथे लपवून ठेवल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी दोघांना अटक केली. त्यांच्याकडून नऊ दुचाकी जप्त केल्या. त्यांनी चिखली, पिंपरी, भोसरी, चाकण, शिवाजीनगर, निगडी पोलीस ठाण्यांतील हद्दीत केलेले वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

# रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने कॅन्सरमुक्त महाराष्ट्र अभियान

## कॅन्सरवरील उपचार मोफत व सवलतीच्या दरात मिळणार; उमेश चव्हाण यांची पत्रकार परिषदेत माहिती

**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**




बदलते वातावरण आणि अनैसर्गिक जीवन पद्धतीमुळे महाराष्ट्रात कॅन्सर रुग्णांची संख्या झपाट्याने वाढली आहे. महागड्या उपचारांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त, कर्जबाजारी झाले आहेत. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना दिलासा व आधार देण्यासाठी रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने कॅन्सरमुक्त महाराष्ट्र अभियान हाती घेण्यात आले असून, या अभियानांतर्गत कॅन्सरवरील महागडे उपचार मोफत करण्यात येणार आहेत, अशी माहिती कॅन्सरमुक्त महाराष्ट्र अभियानाचे प्रमुख तथा रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी युनिव्हर्सल हॉस्पिटलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. स्मिता भोयर, होप हॉस्पिटल अँड कॅन्सर सेंटरचे मुख्य संचालक डॉ. अमोल देवळेकर, कॅन्सर विभागप्रमुख डॉ. अमोघसिद्धी भांडारकर, रुग्ण हक्क परिषदेचे केंद्रीय सल्लागार माजी सहायक पोलीस आयुक्त मिलिंद गायकवाड, परिषदेच्या पुणे शहराध्यक्ष अपर्णा मारणे साठे, अमोल हुलावळे आदी उपस्थित होते.

उमेश चव्हाण म्हणाले, "सध्या स्त्रियांमध्ये स्तनाचा, पिशवीचा कॅन्सर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. तोंडाचा, जिभेचा, रक्ताचा, मेंदूचा, अंडाशयाचा, त्वचेचा कॅन्सर बळावत आहे. तसेच शरीरावर विविध ठिकाणी येणाऱ्या गाठी कॅन्सरच्या असल्याचे निदर्शनास येत आहे. सध्या पुण्यात लाखो रुग्ण कॅन्सरवरील उपचार घेत आहेत. कॅन्सरवरील उपचार घेताना रुग्णांना आर्थिक तडजोड करतानाच कर्जबाजारी व्हावे लागत आहे. अनेक कुटुंबांवर गाडी, दागिने, राहते घर विकून उपचार घेण्याची वेळ येत आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन हे अभियान हाती घेण्यात आले आहे."

"कॅन्सरसाठीची केमोथेरपी, इमिनोथेरपी, कॅन्सरचे ऑपरेशन, रेडिएशन, आवश्यक औषधे व इंजेक्शन यांच्या किमती लाखो रुपयांच्या घरात आहेत. सर्वसामान्य माणसाला हे उपचार परवडणारे नाहीत. त्यामुळे कॅन्सरमुक्त महाराष्ट्र अभियानांत कॅन्सरवरील केमोथेरपी आणि ऑपरेशन शासकीय योजनांच्या माध्यमातून पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत. पुण्यातील शनिवारवाडाजवळ असलेल्या युनिव्हर्सल हॉस्पिटल आणि नाना पेठेतील होप हॉस्पिटल अँड कॅन्सर सेंटर येथे ही मोफत उपचार सुविधा उपलब्ध असणार आहे. अधिक माहितीसाठी रुग्णांनी व नातेवाईकांनी ९८५०००२२०७ या क्रमांकावर संपर्क साधावा," असे आवाहन उमेश चव्हाण यांनी केले आहे.

## थोडक्यात




### पिंपरी : बावधनमध्ये तीन पिस्तूल, पाच काडतुसे, सहा कोयते जप्त

पिंपरी (आरंभ पर्व) : बावधन पोलिसांनी चार वेगवेगळ्या कारवाया करीत पाच जणांना अटक केली. त्यांच्याकडून तीन पिस्तूल, पाच जिवंत काडतुसे, सहा कोयते जप्त केली आहेत. आदेश राम टेमकर (वय २४), हरी महादेव पवार (दोघे रा. सुसगाव), सुमित संजय करेकर (रा. लवळे), गणेश उर्फ गुड्या अनिल पाटेकर (वय २३, रा. शिवणे) आणि केशव त्र्यंबक काळे (रा. बीड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. तर, त्यांच्या एका अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले आहे. पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ जानेवारी रोजी बावधन पोलिसांनी रात्र गस्तीदरम्यान एक मोटार ताब्यात घेतली. मोटारीतून एक पिस्तूल, एक काडतूस आणि गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणात काळेला अटक करण्यात आली. त्यानंतर १३ जानेवारी रोजी गस्त घालत असताना काळ्या काचा असलेली एक मोटार पकडली. तिची झडती घेतली असता त्यामध्ये एक पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे, चार कोयते आणि गुप्ती अशी शस्त्रे आढळून आली. याप्रकरणी करेकर याला अटक करण्यात आली. तिसऱ्या कारवाईमध्ये पवार याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त केली आहे. करेकर आणि पवार यांनी त्यांच्याकडील पिस्तूल हे सराईत गुन्हेगार टेमकर याच्याकडून आणल्याचे सांगितले. त्यामुळे टेमकर याला अटक केली. चौथ्या कारवाईमध्ये करेकर याचे तडीपार साथीदार पाटेकर आणि एक अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन कोयते जप्त केले आहेत. हे दोघेजण कोयते घेऊन दहशत पसरवताना आढळून आले. टेमकर याच्यावर सात, करेकर याच्यावर एक, पाटेकर याच्यावर सहा, काळे याच्यावर एक आणि अल्पवयीन मुलावर तीन गुन्हे दाखल आहेत.



### सुप्रिया सुळेंच्या हस्ते अजित पवार, सुनेत्रा पवारांचा सत्कार

बारामती (आरंभ पर्व) : बारामतीच्या कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने आयोजित कृषक या कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभाला माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार ,खासदार सुप्रिया सूळे,सुनेत्रा पवार या एकाच मंचावर एकत्रित आले होते. यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते अजित पवार आणि खासदार सुनेत्रा पवार यांचा सत्कार करण्यात आला. बदललेल्या राजकीय समीकरणानंतर एकमेकांविरोधात शड्डू ठोकलेले पवार कुटुंबीय या निमित्ताने एकत्र आल्याचे बारामतीकरांना पहावयास मिळाले. मात्र,या मध्ये कोणाचाही अपेक्षित संवाद रंगला नसल्याचे चित्र आहे. लोकसभा विधानसभा निवडणुकीनंतर काका-पुतण्या, नणंद भावजय देखील एका मंचावर एकत्र दिसून आले. कृषी प्रदर्शनाच्या कार्यक्रमात सुप्रिया सुळे यांच्या हस्ते अजित पवार, सुनेत्रा पवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रोबोटने सत्कारासाठीचं लहान रोपटं आणलं. जेव्हा सुप्रिया सुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार असल्याचं मंचावर पुकारण्यात आलं तेव्हा अजित पवार यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमटलं. राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांचाही सत्कार सुप्रिया सुळे यांनी केला. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आज दोन मंत्री याठिकाणी आले आहेत. आपण पुन्हा याठिकाणी याल अशी अपेक्षा आहे. आता वर्षभर कुठलेही इलेक्शन नाहीय, त्यामुळे तिळगुळ घेऊया आणि वर्षभर गोड गोड बोलूया असं म्हणत संक्रांतीच्या शुभेच्छाही सुप्रिया सुळे यांनी सर्वांना दिल्या. सकाळी लवकर उठून कामाला लागण्याची माझी ही पहिलीच वेळ आहे. अजित दादांना माहिती आहे मी उशिरा उठतो. दादांनी रात्रीच सांगितलं होतं. उद्याच्या दिवस तसदी घ्यावी लागेल. तेव्हा मी त्यांना म्हटलं जेव्हा गरज असते तेव्हा खांद्याला खांदा लावून मी कुठेही उपस्थित असतो. नसेल तर पहाटेचा शपथविधी आठवा मीच त्यावेळी पाठीमागे उभा होतो, अशी मिश्कील टीपणी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली. त्यावर सभागृहात एकच हशा पिकला.

# पोलिस हे आपले शत्रु नव्हे मित्र - डॉ. राजकुमार शिंदे

## उपायुक्तांनी साधला एमआयटी एडीटीतील विद्यार्थ्यांशी संवाद

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

विद्यार्थी व युवा हे आपल्या विकसित राष्ट्राच्या वाटचालीतील मुख्य भागिदार आहेत. इंजिनिअर, संशोधक म्हणून त्यांच्या खांद्यावर भविष्यात मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त राहावे, भरपूर अभ्यास करावा आणि आपल्या क्रोधावर नियंत्रण ठेवून कुठलीही समस्या आल्यास थेट कायदा हातात न घेता, प्रथम ११२ या क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधावा. कारण, पोलिस हे आपले शत्रु नव्हे मित्र आहेत, असे प्रतिपादन पुणे शहर झोन-५ चे पोलिस उपायुक्त डॉ.राजकुमार शिंदे यांनी केले.



ते एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी आयोजित वार्तालाप कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी, पुणे शहर हडपसर विभागाच्या सहाय्यक पोलिस आयुक्त अनुराधा उदमले, लोणी-काळभोर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र करणकोट, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, डॉ.सुजित धर्मपात्रे, डॉ. सुदर्शन सानप, डॉ.सुराज भोयार आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.शिंदे बोलताना पुढे म्हणाले, एमआयटी ही महाराष्ट्रासह देशात अत्यंत नावाजलेली संस्था आहे. या संस्थेने आजवर देशाला अनेक संशोधक, इंजिनिअर, नेव्ही अधिकारी दिलेले आहेत. या शैक्षणिक संकुलात शिकलेले विद्यार्थी जगभरात देशाचे नाव उज्वल करत असताना, आपल्या कुठल्या कृतीने संस्थेच्या प्रतिमेला धक्का पोचणार नाही, ही जबाबदारी सर्वप्रथम विद्यार्थ्यांची आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील सुसज्ज क्रीडा संकुलाचा वापर करून विविध खेळ खेळावेत व त्यातून स्वतःला शारीरिकरित्या सदृढ ठेवावे. त्यांनी क्षणिक सुखासाठी व्यसनांना जवळ न करता, आपला कॅम्पस ड्रग, रॅगिंग फ्री ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

याप्रसंगी, लेडी सिंगम म्हणून प्रचलित असणाऱ्या अनुराधा उदमले म्हणाल्या, महाविद्यालयीन काळ हा कुठल्याही विद्यार्थ्याच्या जीवनात अत्यंत मोलाचा असतो. या काळात, विद्यार्थ्यांनी प्रचंड मेहनत करून आपल्या पालकांची स्वप्ने पूर्ण करावीत. त्यांनी क्षणिक आनंदाच्या नादात काही अक्षम्य चुका होणार नाहीत व ज्यामुळे करिअर उद्ध्वस्त होणार नाही याचे भान ठेवावे, असे आवाहन केले.

> **लोणी-काळभोर परिसरात वाढलेल्या युवकांच्या हाणामारीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर आम्ही तातडीने ठोस पावले उचलली आहेत. येथील गावकऱ्यांना तथा युवकांना कुठलीही समस्या असल्यास त्यांनी कायदा हातात न घेता तातडीने आमच्याशी संपर्क साधावा. भविष्यात कायदा मोडणाऱ्यांची कुठल्याही परिस्थितीत हयगय केली जाणार नाही.**
>
> **- राजेंद्र करणकोट, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, लोणी-काळभोर, पोलिस ठाणे.**

> **एमआयटी एडीटी विद्यापीठ हे विश्वशांतीचा संदेश देणारे विद्यापीठ आहे. विद्यापीठाचे कर्मचारी व विद्यार्थी शिस्तप्रिय असून त्याचमुळे कॅम्पसमध्ये आजवर एकही अनुचित प्रकार घडलेला नाही. विद्यापीठाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आपसातील मतभेदांवरून काही घटना घडल्यानंतर त्याची प्रशासनाने नोंद घेतली आहे. त्यानुसार वेळोवेळी विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले जाते. भविष्यातही आम्ही विद्यार्थ्यांच्या शिस्तीबाबत सजग राहू.**
>
> **- डॉ.महेश चोपडे, कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ.**

## शिर्केवाडी-भावानगड रस्त्याचे उद्घाटन

**संगमेश्वर : विलास गुरव (दै. आरंभ पर्व)**

- **आमदार शेखर निकम यांच्या हस्ते उत्साहात संपन्न**

संगमेश्वर तालुक्यातील राजवाडी भावानगड येथे भाविकांना पायीच प्रवास करावा लागत असे. भावानगड हे ऐतिहासिक ठिकाण असून तेथे भवानी आईचे पुरातन मंदिर आहे. मात्र खराब रस्त्यामुळे ग्रामस्थ आणि भाविकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. ग्रामस्थांनी या समस्येकडे लक्ष वेधून रस्त्याची मागणी केली होती. ग्रामस्थांच्या मागणीचा सकारात्मक विचार करत आमदार शेखर निकम यांनी हा रस्ता क वर्ग पर्यटन योजनेंतर्गत मंजूर केला. यामुळे भावानगडवर जाणे अधिक सोयीचे होणार आहे आणि भवानी आईच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय दूर होणार आहे. सदर रस्त्याच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आमदार शेखर निकम यांच्या हस्ते, ग्रामस्थ, स्थानिक पदाधिकारी, व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी आमदार शेखर निकम यांनी ग्रामस्थांच्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत भविष्यात भावानगड परिसराचा सर्वांगीण विकास करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमानंतर आमदार शेखर निकम यांनी भवानगड यात्रौत्सवात सहभागी होऊन भवानी आईचे दर्शन घेतले आणि ग्रामस्थ व भाविकांशी संवाद साधला. यात्रोत्सवासाठी शुभेच्छा देताना त्यांनी भवानगडच्या ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वावर प्रकाश टाकला आणि यात्रोत्सव हा लोकपरंपरांचा अभिमान असल्याचे सांगितले.भवानगड परिसराचा विकास होऊन भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. रस्ता मंजूर करून दिल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांचे आभार मानले. यावेळी माजी जि. प. सभापती राजन कापडी, र. जि. म. बँक संचालक राजेंद्र सुर्वे, सरपंच अस्मिता देवरुखकर, उपसरपंच अमित शिर्के, माजी सरपंच संतोष भडवलकर, मोहन ओकते, अविनाश गुरव, संतोष जाधव, रमेश शिर्के, महेश पुरी, प्रदीप शिर्के, सुमित्रा मांजरेकर, पोलीस पाटील विलास राऊत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व असंख्य भाविक उपस्थित होते.



## अनाथ विद्यार्थ्यांना मायेची ऊब

**राजगुरुनगर : किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशनच्या वतीने कान्हेवाडी (ता. खेड ) येथील श्री शंकर महाराज मठ आश्रमातील अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना १०० उबदार चादरींचे वाटप करण्यात आले.

हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात. दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून तसेच संचालकांनी काढलेल्या मासिक वर्गणीतून अबाल वृध्द, बेवारस, गरजू नागरिक व विद्यार्थ्यांसाठी तसेच गोशाळेतील जनावरांसाठी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी कान्हेवाडी येथील श्री शंकर महाराज मठ आश्रम येथील अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना १०० उबदार चादरींचे वाटप करण्यात आले. कडाक्याच्या थंडीमध्ये मायेची ऊब मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

याप्रसंगी हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, उपाध्यक्षा नाझनीन शेख, सचिव अमर टाटीया, संचालक संतोष सांडभोर, दिलीप होले, संगीता तनपुरे, ॲड. सुनील वाळुंज, ॲड. मनीषा पवळे, दत्ता रुके, राहुल वाळुंज, उत्तम राक्षे, आकाश बोंबले, तसेच श्री शंकर महाराज मठाचे मठाधिपती १०८ परमेश्वर यतीजी महाराज, कान्हेवाडीचे सरपंच बी. डी. कोबल, कांताराम सहाणे, शांताराम कोबल, दीपक नाईकडे, विलास कोबल, धीरज कटारिया, स्वप्नील बोंबले व ग्रामस्थ उपस्थित होते.

## बीपीसीएलकडून लुबी इंडस्ट्रीज एलएलपीला मिळाला कंत्राट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील इलेक्ट्रिक व्हेइकल (EV) इन्फ्रास्ट्रक्चरल प्रगतीसाठी महत्त्वाच्या टप्प्यात, लुबी इंडस्ट्रीजला भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL) द्वारे देशभरात 1,400 फास्ट डीसी चार्जर्सचे उत्पादन, पुरवठा, स्थापना आणि कमिशनसाठी एक मोठे कंत्राट देण्यात आले आहे. मजबूत आणि स्वयंपूर्ण ईव्ही चार्जिंग नेटवर्क तयार करण्याच्या देशाच्या प्रयत्नांमध्ये ही भागीदारी एक मैलाचा दगड आहे.




लुबी इंडस्ट्रीज भारतभरातील बीपीसीएल रिटेल आउटलेट्साना 60kW फास्ट चार्जर प्रदान करेल, ज्यामुळे EV वापरकर्त्यांसाठी निर्दोष आणि विश्वासार्ह चार्जिंग शक्य होईल. हा धोरणात्मक प्रकल्प भारतामध्ये दरवर्षी स्थापित केलेल्या एकूण DC चार्जर्सचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे, ज्यामुळे ईव्हीचा अवलंब वाढविण्यात आणि देशभरात पर्यावरणास अनुकूल टिकाऊ गतिशीलतेला प्रोत्साहन देण्यात मदत होते. भारताच्या हरित ऊर्जा उद्दिष्टांना सशक्त बनवून, भारत ऊर्जा स्वातंत्र्य आणि स्वच्छ वाहतुकीकडे वाटचाल करत असताना, प्रकल्पामध्ये स्थानिक पातळीवर उत्पादित सामग्री आणि नियामक एजन्सीद्वारे निश्चित केलेल्या गुणवत्ता निकषांचे पालन करण्यावर भर आहे. लुबीचे चार्जर्स कमाल अपटाइम आणि दीर्घ ऑपरेशनल लाईफ प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. जे, खरेतर, एक शाश्वत, भविष्य-पुरावा ईव्ही इकोसिस्टम तयार करण्याच्या भारताच्या दृष्टीकोनाचे समर्थन करते. सहयोगाबद्दल भाष्य करताना, लुबी इंडस्ट्रीजचे व्यवस्थापन म्हणाले, "या परिवर्तनीय प्रकल्पासाठी BPCL सोबत भागीदारी केल्याचा आम्हाला अभिमान आहे. आमची ही भागीदारी खरोखरच भारताच्या EV क्रांतीमध्ये योगदान देण्याच्या आमच्या ध्येयाशी सुसंगत आहे. आमचे प्रगत चार्जिंग सोल्यूशन्स अखंडित चार्जिंग प्रदान करतात. केवळ EV वापरकर्त्यांसाठी हा अनुभव केवळ खात्रीच देत नाही तर गंभीर पायाभूत सुविधांच्या उभारणीत स्वदेशीकरणाच्या महत्त्वावरही भर देतो." ईव्हीचा स्वीकारआणि स्वच्छ वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी, हा प्रकल्प एक मोठे, प्रवेश करण्यायोग्य चार्जिंग नेटवर्क तयार करेल.

> **आता भारतात इलेक्ट्रिक वाहने एक वास्तविकता बनत आहेत, लुबी इंडस्ट्रीज आणि बीपीसीएल स्वच्छ वाहतूक पुढे नेण्यासाठी आणि पर्यायी ऊर्जेच्या उपायांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी तयार आहेत.**

# 'देवमाणूस' या मल्टिस्टारर मराठी फिल्मद्वारे चित्रपटसृष्टीत प्रवेश!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"देवमाणूस" हा नव्या वर्षातील सर्वाधिक प्रतिक्षीत मराठी चित्रपटांपैकी एक आहे, हा बहुप्रतीक्षित सिनेमा २५ एप्रिल २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. तू झुठी मैं मकार, दे दे प्यार दे, मलंग, सोनू के टीटू की स्वीटी, आणि वध यांसारख्या ब्लॉकबस्टर सिनेमा बनवणारे पॉवरहाऊस म्हणजेच लव रंजन आणि अंकुर गर्ग यांचा लव फिल्म्स हा प्रोडक्शन हाऊस या मराठी सिनेमाची निर्मिती करत आहे.




तेजस देऊस्कर दिग्दर्शित "देवमाणूस" हा एक मल्टिस्टारर सिनेमा आहे ज्यामध्ये अभिनेते महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक नवी आणि आकर्षक कथा घेऊन येणार आहे हे नक्की.

देवमाणूस या चित्रपटामध्ये कॉन्ट्रास्टींग कॅरेक्टर्स आणि उत्कृष्ट अभिनयासह, अविश्वसनीय कलाकार आहेत. आता पर्यंत निर्मित केलेल्या हिंदी सिनेमांच्या यशापलीकडे जाऊन लव फिल्म्स मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत, प्रॉडक्शन हाऊसची सर्जनशील क्षितिजे वाढवतो आहे हे मात्र खरय. यंदा प्रेक्षकांना, मराठीशी जोडलेला अस्सल अनुभव देऊन, या प्रदेशातील परंपरा, संस्कार आणि मूल्ये समोर आणून लव्ह फिल्म्स काहीतरी वेगळं देणार आहे.

देवमाणूसबद्दल बोलताना दिग्दर्शक तेजस देऊस्कर म्हणतात, “देवमाणूस प्रेक्षकांना वेग वेगळ्या भावनांचा अनुभव देईल. महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ सारखे उत्तम कलाकार ह्यात आहेत ज्यामुळे चित्रपटात असलेली पात्र मी पडद्यावर अक्षरशः जिवंत करू शकलो आहे. आम्ही निर्माण केलेले हे जग प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी मी उत्सुक आहे.”

लव फिल्मसच्या मराठी चित्रपटसृष्टीतील उपक्रमाबद्दल बोलताना, निर्माते लव रंजन म्हणाले, "महाराष्ट्राचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, कला, संगीत आणि कथाकथनाने पिढ्यान पिढ्या प्रेक्षकांना प्रेरणा दिली आहे. मराठी चित्रपटांच्या या जगात पाऊल ठेवताना आम्हाला आनंद होत आहे. देवमाणूस हा पहिला मराठी चित्रपट आम्ही निर्मित केला असून या मराठी परंपरेला आमची आदरांजली आहे. हा या मराठी भूमीचा आणि तिथल्या लोकांच्या भावनेचा उत्सव आहे."

इतकच नव्हे तर निर्माते अंकुर गर्ग सांगतात, “लव फिल्म्समध्ये, आम्ही प्रेक्षकांना कथा सांगण्याचे प्रयत्न करतो जे खोलवर त्यांच्याशी जोडलेल्या असतात. देवमाणूस सारख्या सिनेमा सोबत मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश करणे हा आमच्यासाठी एक रोमांचक नवीन अध्याय आहे. हा चित्रपट मराठी सिनेसृष्टीतील आकर्षक कथा, बारकावे आणि समृद्ध वारशाचा गौरव करतो पण सर्व काही अस्सल मुळाशी जोडून. महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे, सिद्धार्थ बोडके यांसारख्या कलाकार आणि तेजस यांच्या दिग्दर्शनाच्या उल्लेखनीय प्रतिभेने आम्ही एकत्रितपणे एक अविस्मरणीय अनुभव देण्याचे वचन देतो जो प्रेक्षकांना खऱ्या अर्थाने गुंतवेल.”

> **About Luv Films : लव फिल्म्स बद्दल: लव फिल्म्स हे लव रंजन आणि अंकुर गर्ग यांनी २०१२ मध्ये स्थापन केलेले एक भारतीय चित्रपट निर्मिती प्रोडक्शन हाऊस आहे जे आकर्षक चित्रपट तयार करण्यासाठी आणि वितरित करण्यासाठी समर्पित आहे. लव फिल्म्सने विविध प्रकारच्या व्यावसायिक ब्लॉकबस्टर आणि समीक्षकांनी प्रशंसित चित्रपटांची निर्मिती केली आहे, ज्यात छलांग, कुत्ते, वाइल्ड पंजाब यांचा समावेश आहे. कंपनीच्या आगामी प्रकल्पांमध्ये बहुप्रतिक्षित दे दे प्यार दे २, सौरव गांगुलीवरील बायोपिकचा आणि इतर अनेक चित्रपटांचा समावेश आहे.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.